My Krishi Unnati



# टोमॅटो

## क्रॉप शेड्यूल २०२५/२६




## हवामान

१) टोमॅटो पिकास स्वच्छ, कोरडे, कमी आर्द्रता असलेले व उष्ण हवामान चांगले मानवते.
२) १८ अंश ते ३० अंश सेल्सिअस तापमानात हे पीक चांगले येते.
३) जास्त तापमानात, कमी आर्द्रता आणि कोरडे वारे असतील तर टोमॅटो पिकाची फुलगळ होते.
४) उष्ण हवामाना

## जमीन

१) चांगला निचरा असलेल्या मध्यम काळ्या जमिनीत किंवा पोयट्याच्या जमिनीत हे पीक चांगले येते.
२) हलक्या जमिनीत पीक लवकर निघते.
३) पावसाळी टोमॅटो लागवडीसाठी काळी भोर जमीन टाळावी.
४) उन्हाळी टोमॅटो पिक हलक्या व उथळ जमिनीत घेऊ नये.
५) जमिनीचा सामु हा ६ ते ७.५ च्या दरम्यान असावा.
६) जमिनीस योग्य उतार असावा.
७) निमॅटोड असणाऱ्या जमिनीत हे पीक घेऊ नये.

## अंतर




४ × १.२५ फुट
किंवा
५ × १.१५ फुट

| अ. क्र. | दोन ओळीतील अंतर | | दोन रोपतील अंतर | | एकूण अंतर | एकूण क्षेत्रफळ | रोपांची संख्या प्रती एकर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 6 | x | 1.5 | = | 9 फुट सिंगल ओळ | 43560 ÷ 9 = | 4840 रोपे |
| 2 | 6 | x | 1.5 | = | 9 फुट डबल ओळ | 43560 ÷ 9 = | 9680 रोपे |
| 3 | 5 | x | 2 | = | 10 फुट सिंगल ओळ | 43560 ÷ 10 = | 4356 रोपे |
| 4 | 5 | x | 2 | = | 10 फुट डबल ओळ | 43560 ÷ 10 = | 8712 रोपे |

## बेसल डोस

१) १ ते २ ट्रेलर शेनखत, २ ते ४ बॅग कोंबडी खत
२) १०:२६:२६ २ बॅग ५० कि.ग्रॅ. किंवा १२:३२:१६ २ बॅग ५० कि.ग्रॅ.
३) पी.टी.आर.ॲग्रोचे सॉईल रिच गोल्ड २ बॅग एकरी १० कि.ग्रॅ.
४) निंबोळी २ बॅग ४० कि.ग्रॅ (उंणी, हुमणी नियंत्रण)
५) मॅग्नेशियम २५ कि. १ बॅग

## बेड व मल्चिंग

- २ × २.५ ते ३. × ३५ फुट
- सव्वा तीन फुटी किंवा चार फुट मल्चिंग वापरावे.



## रोपांची काळजी

१) पी.टी.आर ॲग्रोचे सुपर ग्रो स्ट्राँग १० लि. पाण्याला ४० मि.ली. + साधे बुरशीनाशक यांचे द्रावण तयार करावे. रोपाच्या ट्रे चा खालची बाजु पाण्यात बुडवुन एक मिनीट ठेऊन रोप लागवडीसाठी द्यावे.
२) रोप नर्सरीमध्ये २१ ते २५ दिवसांची झाल्यानंतर लागवड करावी.
३) खतांची प्राथमिक मात्रा जमीन तयार करतांनाच घ्यावी.
४) चांगले जोमदार व निरोगी रोपांची निवड करावी.
५) पूर्नरलागवड करताना मुळे वाकडी होणार नाही (दुमटणार नाही) ह्याची काळजी घ्यावी.

## झाडांची बांधणी

१) झाडाची बांधणी (तार बांबु) पहिली बांधणी लागवडी नंतर ३१ ते ३५ दिवसांनी करावी.
२) दुसरी बांधणी लागवडीनंतर ५० ते ५५ दिवसांनी करावी.
३) भर देणे व खतांची मात्रा लागवडीनंतर ३० ते ३५ दिवसांनी द्यावी.

## पाणी व्यवस्थापन

१) रोपांची लागवड झाल्यानंतर १ तास पाणी द्यावे.
२) दर ३ ते ४ दिवसांनी पाणी देऊन जमिनीत पुरेसा ओलावा ठेवावा.
३) पावसाळी हंगामात वातावरणानुसार गरज भासल्यास पाणी द्यावे.
४) टोमॅटो पिकास पाण्याच्या अती ताण सहन होत नाही.

## कॅल्शियम + बोरॉनचे महत्व

१) पानातुन फळाकडे अन्न पोहचविण्याचे काम करते.
२) फळ धरण्याचे प्रमाण वाढवते.
३) ब्लॉसम एन्ड रॉट पासुन बचाव करते.

## बोरॉन

१) बी व पेशी भित्तीका तयार होण्यास आवश्यक
२) साखर पसरविण्यास आवश्यक
३) फळास तडा जाऊ देत नाही.

## वॉटर सोलेबल खते

लागवड केल्यानंतर ५ व्या दिवसानंतर खते द्यावीत.

१९:१९:१९ / १२:६१ / १३:४०:१३/ १३:०:४५/ ०:६०:२०

**प्रति एकरी ड्रिप मधुन खते नियोजन :-**

पहिले १० ते १५ दिवस - १९ : १९ : १९ १२ : ६१ : ००

**४ थ्या दिवशी -** १९ : १९ : १९ = ४ कि. पी.टी.आर ॲग्रोचे ॲमिनो १ ली. २०० लि. पाण्यातुन + एक बुरशी नाशक ५०० ग्रॅम.

**१० व्या दिवशी -** १२ : ६१ : ०० = ४ कि. पी.टी.आर.ॲग्रोचे ह्युमक्स स्ट्रॉंग १ कि.ग्रॅम टोमॅटो या पिकामध्ये ८ व्या १० व्या दिवशी नागअळी, मावा, तुडतुडा या किडींचा प्रार्दुभाव होतो. त्या औषधांची फवारणी करावी.

**१५ ते ३० दिवस -**
* १३ : ४० : १३ = ४ कि.
* कॅल्शियम नायट्रेट ४ कि. + बोरॉन ५०० ग्रॅम
* १२ : ६१ = ४ कि. + मॅग्नेशियम सल्फेट = ३ कि.

**२५ व्या दिवशी -** नविन फुटवा येण्यासाठी, भरपुर फुले व फळ धारणा होण्यासाठी पी.टी.आर ॲग्रोचे व्ही स्पेशल हे औषध प्रती ली. ४ मि.ली. या प्रमाणे फवारणी करावी.

**२५ व्या दिवशी -** हिरव्या रंगाची अळी व मावा, तुडतुडा साठी एक फवारणी द्यावी.

२८ व्या दिवशी - पी.टी.आर. ॲग्रोचे ह्युमॅक्स स्ट्रॅाँग १ कि. + सिवीड ५०० ग्रॅम + ॲमिनो क्लासिक स्ट्रॉग २ लि. = २०० लि. पाण्यातुन ड्रीपने सोडावे.

३१ व्या दिवशी – १२ : ६१ : ०० = ५ कि.

३० दिवस - ✻ कॅल्शियम ४ कि. + बोरॉन ५०० ग्रॅम थोड्या वेळानंतर
✻ १३ : ० : ४५ = ४ कि.

३१ ते ३५ दिवस - झाडांची बांधणी ३१ ते ३५ केल्यानंतर प्लॉट मध्ये भुरी या रोगाचा प्रार्दुभाव होतो. त्यासाठी मिराबिस् डिओ या बुरशी नाशकाची फवारणी करावी.

३५ व्या दिवशी - फळ पोखरणारी आणि यासाठी एक फावरणी करावी.

३६ व्या दिवशी - १३:४०:१३ – ४ कि. + मायक्रोन्युटन – १ कि. (२०० पाण्यातुन द्यावे.)

३७ व्या दिवशी - पी.टी.आर ॲग्रोचे व्ही स्पेशल हे औषध प्रती ली. ५ मि.ली. या प्रमाणे फवारणी करावी. (ही फवारणी दर १५ दिवसाला करावी. यामुळे नविन फुटवा भरपुर येणार, आणि नविन फुटव्यालाच फुलकळी असते.)

४० व्या दिवशी - फॅास्फारिक ॲसिड – १ कि. (१५० ली. पाण्यातुन) त्यामुळे झाडांची ग्रोथ होते.

४१ व्या दिवशी - हिरव्या रंगाची अळी व मावा, तुडतुडा साठी एक फवारणी द्यावी.

१) ३० ते ३६ दिवसानंतर १३ : ४० : १३ – ४ कि. एकरी दर ५ दिवसाच्या फरकाने सोडावे. (महिन्यातून दोन वेळेस १ कि. मायक्रोन्युट्रीयन सोडावे.)
२) कॅल्शियम ५ कि. + बोरॅन ५०० कि. १ डोस दर पंधरा दिवसातुन एकदा सोडावा.
३) पी.टी.आर चे ॲग्रोचे १ कि. ह्युमॅक्स स्ट्रॅाँग – ५०० ग्रॅम सिवीड स्ट्रॉग + २ लि. अमिनो क्लासिक स्ट्रॅाग २० ते २५ दिवसांनी २०० लि. पाण्यातून ड्रिप ने सोडावे.

फायदा :-

- पांढऱ्या मुळ्याच्या संख्येत लक्षणीय वाढ.
- नविन कळीचा स्ट्रोक लांब येणार
- सीवीड मुळ मालाची कलर काळोखी चांगली ठेवणार.
- व्ही. स्पेशल स्ट्रॉंग दर १५ दिवसाला फवारणी करावी. यामुळे नवीन फुटवा व फुले भरपुर लागतील.

## टामॅटोवर पडणाऱ्या किडींचे प्रकार

| CMV व्हायरस ? | लीफ कर्ल व्हायरस ? |
|---|---|
|  |  |

## टोमॅटो स्पॉटेड विल्ट विषाणू (तिरंगा)





## व्हायरस प्रसारित करणाऱ्या कीड



थ्रिप्स



मावा



पांढरी माशी



तडतडे

## फळ पोखरणारी अळी नियंत्रण



## लाल कोळी नियंत्रण



## सेप्टोरिय लीफ स्पॉट



## लवकर येणारा करपा



## उशिरा येणारा करपा



## फ्युझेरियम विल्ट



## कॅल्शियम ची कमी (ब्लॉसम एंड रॉट)




PTR Agro

सर्व पिकांच्या माहितीसाठी आजच संपर्क करा

7373732945

www.mykrishiunnati.com Email address ptrgoldcard@gmail.com

My Krishi Unnati